## निशाणी क्र.४३ वरील आदेश

०१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० अन्वये प्रतिवादी म्हणून समाविष्ट करणेसाठी दाखल केलेला आहे.

**अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे की,**

०२. प्रस्तुत दावा वादी यांनी प्रतिवादी क्र.१ ते २२ यांचे विरूध्द वाटप होऊन स्वतंत्र ताबा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. मुळ प्रकरणात प्रतिवादी क्र. ६ यांनी त्यांचे नावावरील मिळकत त्यांच्या मुलांच्या नावे केली असल्यामुळे त्यांना अनुक्रमे प्रतिवादी क्र. ६(१) दिप्तेश दिपक दिक्षीत व प्रतिवादी क्र. ६(२) अभिलाश दिपक दिक्षीत असे म्हणुन समाविष्ट करणे गरजेचे आहे. त्यामुळे वादी यांनी अर्जात नमूद दुरूस्ती करण्याची परवानगी मिळण्याकरिता अर्ज दाखल केलेला आहे.

०३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र. ३ ते ४अ, ४ब, ४क व ५ यांनी अर्जाच्या मलपृष्टावर त्यांचे म्हणणे दाखल करुन सदर अर्ज मंजूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नसल्याचे सांगतले.

०४. अर्ज त्यावरील शपथपत्र व वादी यांचे वकिलांचा युक्तिवाद ऐकला. दाव्यामध्ये अर्जात नमूद दुरूस्ती करणे आवश्यक आहे. सदर दुरुस्ती अर्ज मंजूर केल्यास वादीचे काहीही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्यासाठी व वादी, प्रतिवादीमधील वादाचे कायमचे निराकरण होण्यासाठी मदत होणार आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने अर्जात मागितलेली दुरुस्ती करण्यास परवानगी देणे उचीत होणार आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. वादी यांनी निशाणी क्र.४३ वरील अर्जात मागितलेली दुरुस्ती वादी यांनी आदेश तारखेपासून १४ दिवसांमध्ये करावी व तशी दावा दुरुस्तीची प्रत दाव्याचे कामी दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by ROHINI VISHNU PATIL
Date: 2025.05.10 13:05:40 +0530

दिनांकः ०९.०५.२०२५

(श्रीमती आर. व्ही. पाटील )
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
भोकरदन.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्राप्रमाणे आहे.

लघूलेखकाचे नावः श्रीमती एस.आर. इंगळे
न्यायालयाचे नावः दिवाणी न्यायालय क. स्तर भोकरदन
मा. साहेबांनी चेक केले
व पी.डी.एफ. दिनांकः ०९.०५.२०२५

स्वाक्षरीत/–
लघुलेखकाची सही